नि.फौ.ख.क्र.५०/२०२३
सरकार वि.अनिल
नि.क्र.२६

साक्षीदार क्र **०७** ची सरतपासणी
देवाची शपथ खरे सांगतो
नाव :–शंकर देवराव मेंढूले
वय:–५२ वर्ष, व्यवसाय–मजुरी
राह.सालेभट्टी, ता.भिवापूर, जि.नागपूर.

**<u>सरतपासणी सरकारी वकील श्री.जे.एम.बोरकर यांच्या मार्फत</u>**

१. घटनेची तारिख मला माहिती नाही. मी घटनेच्या दिवशी बैलबंडी पाहण्यासाठी गावात गेलो होतो त्यावेळी मला फिर्यादी व आरोपी यांचा झगडा चालु असतांना दिसला व मी त्यांचा झगडा सोडविला व घरी निघून गेलो. हे मला माहित नाही की, आरोपीने फिर्यादीच्या डोक्यावर काठी मारली व दुखापत केली किंवा कसे.

**<u>सदर साक्षीदार अभियोग पक्षास कोणत्याही मुद्दयावर सहकार्य करीत नसल्याने त्यास उत्तरसुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली असता, परवानगी देण्यात येते.</u>**

२. हे म्हणणे खरे नाही की, दि.०१/०३/२०२२ रोजी सकाळी ९ वाजताच्या दरम्यान मी माझ्या घरी हजर असतांना तेव्हा मला रोडवर जोरजोराचा आवाज आला व मी बाहेर येउन पाहिले असता राहूल मेंढूले हा त्याच्या शेतातून आणलेला कडबा ट्रॅक्टरमधून खाली उतरवत होता. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी माझा भाऊ अनिल शेरकी हासुध्दा तेथे त्याच्या हातात वेळवाची काठी घेउन उभा होता व तो राहूल मेंढूले याला शिवीगाळ करित होता व म्हणत होता की, आमच्या भावांमध्ये येउन संजय मारोती शेरकी याचा भाग का घेतो त्या कारणावरून आरोपीने फिर्यादीसोबत झगडाभांडण करून शिवीगाळ केली व आरोपीने त्याच्या हातात असलेल्या वेळवाच्या काठीने फिर्यादीच्या डोक्यावर मारून जखमी केले व मारण्याची धमकी देउन निघून गेला व त्यावेळी फिर्यादीच्या डोक्यातुन रक्त निघत होते. आता मला माझ्या बयाणातील **अधोरेखांकित भाग अ** वाचुन दाखविण्यात आला तो पोलिसांनी माझ्या सांगण्याप्रमाणे लिहीलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**<u>सरतपास संपला.</u>**

**<u>आरोपीतर्फे ॲड.आर.बी.भोंबे यांच्यातर्फे उलटतपास सुरू.</u>**

३. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादी हा आरोपीच्या घरी जाउन शिवीगाळ करित

होता. हे म्हणणे खरे नाही की, सदर झगड्यामध्ये आरोपी हा पडला व त्याला लागले.

**<u>उलटतपास संपला.</u>**

**<u>फेरतपास काही नाही.</u>**

वा.दा.ब.अ.सा. समक्ष

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरेड
दि.२१/०७/२०२५

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
उमरेड